महाराष्ट्र लोकसेवा आयोग
MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION
मुख्य कार्यालय
बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५
Bank of India Bldg, 3rd fl oor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915
माझगांव कार्यालय
विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव,मुंबई ४००२०३ ☎ २३७८९७०१/०४/०५/०६/०८ फॅक्स : २३७८१०६१
Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23789701/04/05/06/08 Fax : 23781061
ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# कर सहायक परीक्षा -२०१४

**जाहिरात क्रमांक : २०९/२०१४ क्रमांक १४४२(क.स.)/२०१४/तीन**

शासनाच्या **विक्रीकर विभागातील कर सहायक, गट-क संवर्गातील** एकूण ७०० पदांच्या भरतीकरिता आयोगातर्फे **कर सहायक परीक्षा -२०१४ रविवार दिनांक २२ फेब्रुवारी, २०१५** रोजी महाराष्ट्रातील **३६ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. **अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व या पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**४. उपलब्ध पदसंख्या**

| एकूण पदसंख्या | | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व. | शै. व सा. मा. प्रवर्ग | विमाप्र-अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे ७०० | सर्वसाधारण | १०३ | ४५ | २४ | १० | ८ | ११ | ७ | ७ | ६५ | ५५ | १७ |
| | महिला * | ६० | २६ | १४ | ६ | ५ | ७ | ४ | ४ | ३८ | ३४ | ११ |
| | खेळाडू ☑ | ९ | ४ | २ | १ | १ | १ | १ | १ | ६ | ६ | २ |
| | माजी सैनिक ▲ | ३१ | १३ | ७ | ३ | २ | ४ | २ | २ | १९ | १७ | ५ |
| | एकूण | २०३ | ८८ | ४७ | २० | १६ | २३ | १४ | १४ | १२८ | ११२ | ३५ |
| | विकलांग व्यक्ती @ | एकूण २१ पदे = चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू-७ पदे, अंधत्व किंवा क्षीणदृष्टी ७ पदे, श्रवणशक्तीतील दोष ७ पदे | | | | | | | | | | |

**टीप** :- * उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित ☑ उपलब्ध असल्यास खेळाडूंकरिता आरक्षित ▲ उपलब्ध असल्यास माजी सैनिकांसाठी आरक्षित @ उपलब्ध असल्यास विकलांग व्यक्तींकरिता आरक्षित

४.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

४.२ वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीपैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.३ खेळाडूंचे आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडूसाठी राखीव पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांना त्याची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मूळ प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी आयोगाकडून आमंत्रित केल्यानंतर प्रमाणपत्राच्या तपासणीकरीता येण्यापूर्वी क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

४.४ **समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.**

४.५ **परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयांसाठी विहीत केलेली वयोमर्यादा, परीक्षा शुल्क, तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.**

४.६ विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. विकलांगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४.७ विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. **तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून ७ दिवसांच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे अनिवार्य आहे.**

५. **वेतनश्रेणी** :- रूपये ५,२००-२०२०० (ग्रेड पे-२,४००) अधिक नियमानुसार भत्ते.

**६. पात्रतेच्या अटी :-**

६.१. भारतीय नागरिकत्व.

६.२ वयोमर्यादा :- **दिनांक १ ऑगस्ट, २०१४** रोजी किमान १८ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६.३. उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

६.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

६.३.२ विकलांग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

६.३.३ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

६.३.४ माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

६.३.५ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

६.३.६ वयोमर्यादा शिथिलतेबाबत कोणतीही एक सवलत (अधिकतम) लागू होईल.

**७ शैक्षणिक अर्हता :-**

७.१ सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली पदवीशी समतुल्य अर्हता

७.२ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

७.३ मराठी टंकलेखनाचा वेग **३०** शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग **४०** शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र.

७.४ सदर टंकलेखनाच्या वेगाबाबत शासकीय परीक्षा मंडळाची परीक्षा अर्ज सादर करण्याच्या विहित अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक ३ डिसेंबर, २०१४** किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

७.५ अंतर्वासिता (Internship) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

७.६ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च, २००३ तसेच शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना** " तसेच " **परीक्षा** " या विभागातील " **कर सहायक परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

९ **शुल्क** : ९.१ अमागास - **३६५/-** ९.२ मागासवर्गीय - **२६५/-** ९.३ माजी सैनिक - **१५/-**

९.४ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलना व्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

९.५ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलब्ध आहे.

**१० अर्ज करण्याची पद्धत :-**

१०.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१०.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (**Web-based**) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ ते दिनांक ३ डिसेंबर, २०१४** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवानी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

१०.५.१ शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील माझे खाते या लिंक वर क्लिक करावे.

१०.५.२ "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

१०.५.३ **Pay Now** " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

१०.५.४ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन करता येईल.

१०.५.५ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१०.५.६ चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

१०.५.७ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. .

१०.६ **केंद्र निवड :-**

१०.६.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता माझे खाते मधील आवश्यक पदाची निवड करावी. त्यानंतर केंद्र निवडा या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. जर केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

१०.६.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

१०.७ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१३. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ४ डिसेंबर, २०१४ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**१४. कर सहायक** परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपल्ब्ध आहे.

ठिकाण : मुंबई.

दिनांक : **१३ नोव्हेंबर, २०१४**

श्री. शं. पाठक

उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**